# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ५५ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१८३१ : सावित्रिबाई फुले यांचा जन्मदिन.

१९३१ : महात्मा गांधींनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी गोलमेज परिषदेत केली.

१९५० : पुणे येथे राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेची सुरुवात झाली.

१९५२ : भारतातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या.

सेन्सेक्स ८५,७६२.०१ +५७३.४१ (०.६७%)

डॉलर ₹ ९०.१०

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १५ |
| दिल्ली | १७ | १० |
| मुंबई | ३३ | १९ |
| नागपूर | २८ | १४ |
| पुणे | ३० | ११ |

**सुविचार**

आयुष्य सुंदर आहे, फक्त त्याला सुंदर बनवायचं तुमच्यावर आहे.

सुर्योदय - सुर्यास्त

स.-७:०५ संध्या-५:५९

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)

१,३८,४७५/- २,४२,०००/-

**केळी भाव**

नवती : ७५१ ते ७७०

पिल बाग : २५१ ते २७०

कांदे बाग : ----

## थोडक्यात

### ७० लाखांचा लाचेचा हप्ता मिळताच महिला अधिकारी म्हणाल्या, 'सोनं घ्या'

**झांसी ।** एका फोन कॉलमुळे झाशीमधील केंद्रीय जीएसटी विभागातील भ्रष्टाचाराचे मोठे रॅकेट उघडकीस आले आहे. एका महिला आयआरएस अधिकाऱ्याला लाच घेण्याच्या आरोपाखाली अटक केली. केंद्रीय जीएसटी विभागातील दीड कोटींच्या एका लाच प्रकरणात सीबीआय अधिकारी लक्ष ठेवून होते. यावेळी एका फोन कॉलमुळे सीबीआयच्या हाती मोठा पुरावा लागला व मोठे रॅकेट उघडकीस आले.

### मुस्तफिजूरची केकेआरमधून हकालपट्टी करा

**मुंबई ।** बांगलादेशमध्ये हिंदू अल्पसंख्याकांवर होत असलेल्या अत्याचारांचे तीव्र पडसाद भारतीय क्रिकेट वर्तुळात उमटू लागले आहेत. आयपीएल २०२६ च्या हंगामासाठी कोलकाता नाईट रायडर्सने बांगलादेशी वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर रहमानला ९.२० कोटी रुपयांना खरेदी केले आहे. मात्र, या निवडीवरून आता मोठा धार्मिक वाद निर्माण झाला आहे.

# माघारीसाठी भाजपाच्या उमेदवारांमध्ये तुंबळ हाणामारी

## शिंदेंच्या शिवसेनेत मोठी बंडखोरी; राष्ट्रवादीला बालेकिल्ल्यातच धक्का

वृत्तसंस्था । मुंबई



**महापालिका निवडणुकींच्या धामधुमीत शिंदेंच्या शिवसेनेत मोठी बंडखोरी झाली असून गोरेगावमधील २०० जणांनी सामूहिक राजीनामे दिले नाशिकमध्ये उमेदवारी अर्ज मागे घेताना भाजपाच्या उमेदवारांमध्ये सिनेस्टाईल हाणामारी झाल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मोठा धक्का बसला असून भाजपाचे दोन उमेदवार बिनविरोध निवडून आले ठाण्यात विरोधी पक्षांच्या उमेदवारांवर अर्ज माघारी घेण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांच्या माध्यमातून दबाव आणल्याचा गंभीर आरोप खासदार संजय राऊत यांनी केला. जळगावमध्ये शिंदे आणि भाजप गटातील उमेदवार कसे बिनविरोध होतील, यासाठी नेत्यांनी आपले कसब पणाला लावले.**

महापालिका निवडणुकीचा अर्ज मागे घेण्यासाठी अवघे काही तास शिल्लक असताना शिवसेना शिंदे गटात मोठी बंडखोरी झाली. मुंबईत शिंदे गटातील ३५ ते ४० पदाधिकाऱ्यांनी आपले अपक्ष अर्ज माघार घेण्यास नकार दिला आहे. कोणत्याही परिस्थिती आम्ही अर्ज माघारी घेणार नसल्याचे सांगत आपण अपक्ष निवडून येणार असल्या विश्वास बंडखोरांनी व्यक्त केला आहे.

या बंडखोरांना समजवण्यासाठी शिदे गटातील नेत्यांना अपयश आल्याचे (पान २ वर)

### • नाशकात भाजपाच्या उमेदवारांमध्ये तुंबळ हाणामारी

**नाशिक महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्जाची माघार घेताना भाजपाच्या दोन उमेदवारांमध्ये सिनेस्टाईल हाणामारी झाली. सिडको विभागीय कार्यालयातच ही हाणामारी झाल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यादरम्यान पोलिसांनी वेळीच मध्यस्थी करून हा वाद मिटवल्याची माहिती आहे. या हाणामारीचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर वाऱ्याच्या वेगाने व्हायरल झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सिडको विभागातील प्रभाग क्रमांक ३१ मध्ये भाजपाकडून देवानंद बिरारी आणि बाळकृष्ण शिरसाट हे दोघेही उमेदवारीसाठी इच्छुक होते. परंतु ऐनवेळी पक्षाने देवानंद बिरारी यांना उमेदवारी नाकारली. त्यामुळे बाळकृष्ण शिरसाट हे भाजपाचे अधिकृत उमेदवार म्हणून जाहीर झाले. यादरम्यान अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी देवानंद बिरारी व त्यांच्या पत्नी माजी नगरसेविका वंदना बिरारी हे दोघेही मनपाच्या सिडको विभागीय कार्यालयात आले होते. त्यावेळी देवानंद बिरारी व बाळकृष्ण शिरसाट यांच्यात शाब्दिक चकमक होऊन हाणामारी झाली.**

### ➢ धुळ्यात उमेदवारांना डांबून ठेवणे म्हणजे लोकशाहीचा गळा आवळण्याचा प्रकार : पालकमंत्री रावल

धुळे शहरातील ६३ जागांसाठी भाजपकडे तब्बल ४५० इच्छुकांनी उमेदवारी मागितली होती. पक्षाने नियमानुसार ६३ उमेदवारांना अधिकृत तिकीट दिले. मात्र, तिकीट न मिळालेल्या काही इच्छुकांमध्ये नाराजी निर्माण झाली. याच नाराजीचा गैरफायदा घेत विरोधी पक्षांनी भाजपच्या कार्यकर्त्यांना फूस लावून, आमिष दाखवून आपल्या गोटात ओढले आणि ऐनवेळी 'एबी फॉर्म' देत निवडणुकीच्या रिंगणात उतरवले, असा आरोप त्यांनी केला. याप्रक्रियेत काही ठिकाणी दडपशाही होत आहे. भाजपच्या काही कार्यकर्त्यांना चक्क खोल्यांमध्ये बंद करून ठेवण्यात आल्याचे सांगत, अशा प्रकारे उमेदवारांना डांबून ठेवणे म्हणजे लोकशाहीचा गळा आवळण्याचा प्रकार असल्याची टीका त्यांनी केली.

### राज्य निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय

# बिनविरोध उमेदवारांची होणार चौकशी

वृत्तसंस्था । मुंबई

**आगामी नागरी निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्षांचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याच्या पार्श्वभूमीवर, विरोधी पक्षांकडून झालेल्या गंभीर आरोपांची महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग (एसईसी) चौकशी करणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी दबाव, प्रलोभन किंवा जबरदस्तीचा वापर झाला का, याबाबत आयोगाने संबंधित महानगरपालिकांकडून सविस्तर अहवाल मागवले आहेत.**

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुका १५ जानेवारी रोजी होणार असून मतमोजणी १६ जानेवारीला होईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३० डिसेंबर होती. ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत भाजपचे पाच आणि शिवसेनेचे चार उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

पिंपरी-चिंचवड, जळगाव आणि छत्रपती संभाजीनगर येथेही किमान एक भाजप उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे.

आयोगाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, संबंधित प्रभागांतील निवडणूक अधिकारी, महानगरपालिका आयुक्त (निवडणूक प्रभारी) आणि पोलीस आयुक्तांकडून अहवाल मागवले जातील. हे अहवाल प्राप्त होईपर्यंत बिनविरोध निवडीची अधिकृत घोषणा करण्यास निवडणूक अधिकाऱ्यांना परवानगी दिली जाणार नाही. काँग्रेस, जनता दल (एस) आणि आम आदमी पक्षाने मुंबईतील कुलाबा येथील काही प्रभागांमध्ये उमेदवारांना दबावाखाली बेकायदेशीररीत्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यापासून रोखल्याचा आरोप केला आहे.

### राज्यातील २९ लाख विद्यार्थी अपार आयडी नोंदणीविना

वृत्तसंस्था । मुंबई

राज्यातील सुमारे २९ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांची अद्याप अपार आयडी नोंदणी झालेली नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांची तातडीने ३१ जानेवारीपर्यंत नोंदणी करण्याचे निर्देश महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने दिले आहेत. राज्यात सध्या सुरू असलेल्या विविध महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणुकीच्या कामाबरोबरच आता शिक्षकांना अपार आयडी नोंदणीचे कामही युद्धपातळीवर करावे लागणार आहे.

## ई-केवायसी न केलेल्या ६७ लाख लाडक्या बहिणी लाभापासून राहणार वंचित

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्य सरकारची अत्यंत महत्त्वाकांक्षी ठरलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक केले होते. मात्र, दिलेल्या मुदतीपर्यंत राज्यातील २ कोटी ४७ लाख महिलांपैकी १ कोटी ८० लाख महिलांनी ई-केवायसी केली, तर तब्बल ६७ लाख महिलांनी ई-केवायसी न केल्यामुळे अखेर त्या आता लाडकी बहिणीच्या लाभापासून कायमच्या वंचित राहणार आहेत.**

महिला व बालविकास विभागातील अधिका-याने दिलेल्या माहितीनुसार, सध्या राज्यात एकूण २ कोटी ४७ लाख महिला पात्र होत्या. त्यापैकी केवळ १ कोटी ८० लाख महिलांनीच विहित मुदतीत ई-केवायसी केली आहे. उर्वरित ६७ लाख महिलांनी ही प्रक्रिया पूर्ण न केल्याने त्या आता या लाभापासून मुकणार (पान २ वर)

# देशात बांगलादेश-नेपाळ सारखे आंदोलन आवश्यक

## • जेजेपी प्रमुख अजय चौटाला यांचे वादग्रस्त विधान

वृत्तसंस्था । महेंद्रगड



हरियाणातील जननायक जनता पक्षाचे (जेजेपी) राष्ट्रीय अध्यक्ष अजय चौटाला यांचे एक वादग्रस्त विधान समोर आले आहे. महेंद्रगड जिल्ह्यात आयोजित युवा योद्धा परिषदेत जनतेला संबोधित करताना त्यांनी, 'राज्यकर्त्यांना त्यांच्या सिंहासनावरून खाली खेचले पाहिजे, रस्त्यावरून हाकलून लावले पाहिजे,' असे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी असेही म्हटले की, 'भारताला नेपाळ आणि बांगलादेशमध्ये ज्या चळवळींमध्ये राज्यकर्त्यांना क्रूर वागणूक दिली गेली होती, त्या चळवळीची गरज आहे'. असे म्हणून त्यांनी एका नवीन वादाला तोंड फोडले आहे.

जेजेपी अध्यक्ष अजय चौटाला म्हणाले, 'त्यांना (शासकांना) देश सोडण्यास भाग पाडले पाहिजे. बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंकेत घडलेल्या घटनांप्रमाणेच येथेही अशीच चळवळ राबवावी लागेल. अजय चौटाला हे हरियाणाचे माजी उपमुख्यमंत्री दुष्यंत चौटाला यांचे वडील आणि माजी मुख्यमंत्री ओमप्रकाश चौटाला यांचे पुत्र आहेत.

• अजय चौटाला म्हणाले, शेजारील देशांतील तरुणांनी निषेधाच माध्यमातून सरकार उलथवून टाकले आहे, ज्यामुळे राज्यकर्त्यांना रातोरात देश सोडण्यास भाग पाडले आहे. नेपाळच्या तरुणांनी संघटित होऊन त्यांना रस्त्यावर मारहाण केलीच नाही तर देशाबाहेर हाकलून लावले. त्याचप्रमाणे, या राज्यकर्त्यांना त्यांच्या सिंहासनावरून खेचले पाहिजे, रस्त्यावरून हाकलून लावले पाहिजे आणि मारहाण केली पाहिजे. त्यांना देश सोडण्यास भाग पाडले पाहिजे. तरच आपण या कुशासनातून मुक्त होऊ, असेही त्यांनी म्हटले आहे.

### शाळांच्या संचमान्यतेसाठी १५ जानेवारीपर्यंत मुदत

वृत्तसंस्था । मुंबई

त्रुटी दूर करून १५ जानेवारीपर्यंत संचमान्यतेची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश शिक्षण संचालनालयाकडून राज्यातील शाळांना देण्यात आले असून दिलेल्या मुदतीत संचमान्यतेची प्रक्रिया पूर्ण न केल्यास संबंधित शाळांचे वेतन थांबविण्यात येईल, असा इशारा शिक्षण संचालनालयाकडून देण्यात आला आहे.शालेय शिक्षण विभागाच्या १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानंतर १४ ऑक्टोबर २०२५ रोजी सुधारित सूचना दिल्या होत्या. त्यानुसार १३ डिसेंबर २०२५ रोजी शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी संचमान्यतेबाबतचे परिपत्रक काढले आहे.

# बी.एस्सी नर्सिंगच्या पाच हजारपेक्षा अधिक जागा रिक्त

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून राबविण्यात येत असलेल्या बी.एस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाची तिसरी फेरी नुकतीच पार पडली. या फेरीनंतर जवळपास ५ हजार ५७३ जागा रिक्त राहिल्या आहेत. यामध्ये खासगी महाविद्यालयांमध्ये ५ हजार ५६७, तर सरकारी महाविद्यालयांमध्ये अवघ्या ६ जागा रिक्त राहिल्या आहेत.**



भारतीय परिचारिका परिषदेच्या (आयएनसी) सूचनेनुसार बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमांच्या महाराष्ट्रात १६ हजार ५३० जागा आहेत. या जागांवर प्रवेश मिळवण्यासाठी राज्यभरातून ४७ हजार ५०१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४३ हजार १९१ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. नर्सिंग अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया ३१ ऑक्टोबर रोजी पार पडली. त्यानंतर अनेक महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त राहिल्याने या संस्थांनी परिषद आणि सीईटी कक्षाकडे प्रवेश प्रक्रियेला मुदतवाढ देण्याची मागणी केली होती.

या मागणीची दखल घेऊन विशेष संस्थात्मक प्रवेश फेरी राबविण्याचा निर्णय (पान २ वर)

# शासकीय जनआरोग्य योजनांमधून कोणालाही उपचार नाकारू नये

## सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांचे निर्देश

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील प्रत्येक गरजू रुग्णाला शासकीय आरोग्य योजनेतून विनासायास, मोफत आणि प्रभावी उपचार मिळालेच पाहिजेत. प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत अंगीकृत असलेल्या कोणत्याही खासगी अथवा शासकीय रुग्णालयाने कोणत्याही कारणास्तव रुग्णाला उपचार नाकारू नयेत, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.**



प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत असलेल्या खासगी व शासकीय रुग्णालयांचे प्रतिनिधी आणि कर्मचाऱ्यांची आढावा बैठक शुक्रवारी झाली. त्यावेळी आबिटकर बोलत होते. बैठकीस महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अण्णासाहेब चव्हाण, ठाणे जिल्हा परिमंडळाचे उपसंचालक डॉ. अशोक नांदापूरकर यांच्यासह विविध खाजगी व शासकीय रुग्णालयांचे प्रतिनिधी, तसेच दोन्ही जनआरोग्य योजनांचे कर्मचारी उपस्थित होते. (पान २ वर)

### • जनआरोग्य योजनांबाबत जनजागृती करण्याच्या सूचना

शासकीय जनआरोग्य योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी, पारदर्शक आणि गरीब आणि गरजू माणसाला मदत करण्याच्या भावनेने जनआरोग्य योजना अधिक लोकाभिमुख करावी, असे सांगत आबिटकर यांनी तज्ज्ञ समितीची नियमित बैठक घेण्याची सूचना केली. महात्मा फुले जनआरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेची राज्यभर जनजागृती करावी, या योजनांची माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचल्यास पात्र लाभार्थ्यांना वेळेत उपचार मिळण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.

## भाजप उमेदवारांचा वाद; मनसे पदाधिकाऱ्याच्या जीवावर बेतला!

वृत्तसंस्था । सोलापूर



**येथील महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी धक्कादायक घटना घडली आहे. प्रभाग क्रमांक २ मध्ये भाजपच्या अधिकृत उमेदवार शालन शिंदे विरुद्ध बंडखोर उमेदवार रेखा सरवदे यांच्या अर्ज माघारीवरून दोन गटांत टोकाचा वाद झाला.**

या वादात भाजपच्या जोशी गल्लीतील शंकर शिंदे यांच्या संपर्क कार्यालयाची तोडफोड करण्यात आली. याच राड्यात मनसे विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी बाळासाहेब सरवदे यांची हत्या झाल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर महापालिका परिसरातील घटनास्थळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात आहे.

सोलापूर महापालिका प्रभाग २ मध्ये अर्ज माघारी घेण्यावरून आज भाजपच्या दोन गटात वाद झाला. प्रभाग (पान २ वर)

## संपादकीय

### नवी जुळवाजुळव

प्रत्येक वर्ष आपल्यासोबत काही आव्हाने आणि संधीही घेऊन येते. वर्षभरात बरेच बदल, घडामोडी होतात. २०२६ या वर्षातही बदल होतील. केरळ, तमिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम या राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. उत्तर प्रदेश या महत्त्वाच्या राज्यातही लवकरच शंखनाद होईल. वर्षाची सुरुवात होत असतानाच महाराष्ट्रात निवडणुकांचा बिगूल वाजला आहे. राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका होत आहेत. त्याच्या काही दिवस अगोदरच नगर परिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका झाल्या व त्यांचा कौलही मिळाला.महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुकांची घोषणा होणार आहे. त्यामुळे नव्या वर्षाचा जानेवारी हा संपूर्ण महिना आणि पुढच्या महिन्याचा काही भाग हा राज्याच्या राजकारणाची आणि जनमताची दिशा दर्शवणारा ठरणार आहे. नगर पंचायतींच्या निवडणुकांत भारतीय जनता पार्टी सगळ्यांत बलवान पक्ष ठरला. अपेक्षेप्रमाणे एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर आहेत. काँग्रेस, राशप आणि उद्धव ठाकरेंची शिवसेना यांना अत्यंत मर्यादित किंवा नगण्य असे स्थान मिळाले आहे. वास्तविक या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या असतात असे म्हटले जाते.स्थानिक स्तरावर काम करणारे आणि न करणारे यांची निवड मतदार करत असतात. कार्यकर्त्यांसाठी ही संधी असते. त्यात सत्ताधारी पक्षांनी आणि विशेषत: भारतीय जनता पार्टीने सर्व शक्ती पणाला लावण्यास सुरुवात केल्यामुळे या निवडणुकाही युद्धभूमी झाल्या. महापालिका निवडणुका आता त्याचा पुढचा अंक आहे. ग्रामीण महाराष्ट्र सध्याच्या राजकीय घडामोडींकडे कसा पाहतो याचे चित्र जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत स्पष्ट होईल.दशकभरात राज्याच्या राजकारणात अनेक स्थित्यंतरे झाली. त्यातही मागचा पाच वर्षांचा काळ फारच कुंठीत करणारा होता. दोन पक्षांचे चार पक्ष झाले. अखंड शिवसेना फुटली आणि एकनाथ शिंदे यांच्याकडे धनुष्यबाण गेले. मुळ शिवसेना ज्यांनी स्थापन केली त्या बाळासाहेब ठाकरेंच्या मुलाकडे उद्धव ठाकरेंकडे उर्वरित शिवसेना राहिली आणि त्यांच्या हाती मशाल आली. उद्धव यांचे चुलतबंधू राज ठाकरे साधारण दोन दशकांपूर्वी शिवसेनेतून बाहेर पडले होते. त्यांनी पक्षाचा सेटअप बिघडवला नव्हता. स्वत:ची संघटना उभी केली. इकडे शरद पवार यांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्याही दोन राष्ट्रवादी झाल्या. नव्या राष्ट्रवादीचे नेतृत्व अजित पवार यांच्याकडे गेले. फूट पडण्याच्या अगोदर दोन्ही शिवसेना आणि दोन्ही राष्ट्रवादी राज्याच्या महाविकास आघाडी सरकारमध्ये सत्तेत होते. लोकसभा निवडणुकीत दिल्लीत चारशे पारचा नारा भारतीय जनता पार्टीने दिला होता. त्यानुसार राज्यात ऑपरेशन लोटसफ सुरू झाले. शरद पवारांचे आणि उद्धव ठाकरेंचे बहुतांश नेते आणि पदाधिकारी भाजपसोबत गेले. विरोधकच राहिले नाहीत, तर दिल्लीसाठीचा आकडा गाठणे सोपे होईल असे भाजपचे गणित होते.

# जळगाव महापालिकेच्या इतिहासात प्रथमच १२ उमेदवार बिनविरोध

## भाजपाचे ५, शिंदे सेनेचे ३ उमेदवार आजच विजयी घोषित

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत यंदा एक नवा राजकीय इतिहास घडला असून, महापालिकेच्या स्थापनेपासून आजवर प्रथमच तब्बल १२ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. शुक्रवार, दि. २ जानेवारी रोजी माघारीच्या शेवटच्या दिवशी अनेक उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने महायुतीतील भाजपचे पाच तर शिंदे गटाच्या शिवसेनेचे तीन उमेदवार बिनविरोध विजयी घोषित झाले. यापूर्वी झालेल्या माघारी व छाननीमुळे महायुतीचे आणखी चार उमेदवार आधीच बिनविरोध झाले आहेत.**



निवडणूक प्रक्रियेच्या सुरुवातीला छाननीदरम्यान एका उमेदवाराचा अर्ज बाद झाल्याने भाजपची एक जागा बिनविरोध झाली होती. त्यानंतर माघारीच्या पहिल्याच दिवशी, गुरुवारी प्रभाग क्रमांक ९ अ, ९ ब तसेच प्रभाग १८ अ मधील उमेदवारांनी माघार घेतल्याने शिंदे सेनेच्या तीन जागा बिनविरोध निश्चित झाल्या होत्या. त्यामुळे या टप्प्यावर महायुतीच्या एकूण चार जागा बिनविरोध झाल्या होत्या.

आज माघारीचा अंतिम दिवस असल्याने महायुतीने जोरदार हालचाली करत अपक्ष तसेच उबाठा गटाच्या उमेदवारांची मनधरणी केली. विविध राजकीय समीकरणे, आश्वासने व दबाव यामुळे अनेकांनी माघार घेतल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. याचा थेट फायदा महायुतीला झाला असून दुपारी ३ वाजेपर्यंत भाजप-शिंदे सेना मिळून एकूण आठ उमेदवारांची बिनविरोध निवड निश्चित झाली.

बिनविरोध निवड झालेल्या उमेदवारांमध्ये भाजपकडून आमदार सुरेश भोळे यांचे चिरंजीव विशाल सुरेश भोळे, माजी नगरसेविका दीपमाला मनोज काळे, अंकिता पंकज पाटील, वैशाली अमित पाटील व डॉ. विश्वनाथ खडके यांचा समावेश आहे. शिंदे सेनेकडून माजी नगरसेवक गणेश उर्फ विक्रम सोनवणे, माजी नगरसेविका रेखा चुडामण पाटील



आणि सागर श्याम सोनवणे यांची निवड बिनविरोध झाली आहे.

**जळगाव शहरात एकूण १९ प्रभागांतून ७५ नगरसेवक निवडले जाणार आहेत. त्यापैकी अवघ्या दोन दिवसांत भाजप व शिंदे सेनेचे प्रत्येकी सहा असे एकूण १२ उमेदवार बिनविरोध निवडून येणे हा महापालिकेच्या इतिहासातील विक्रम ठरला आहे. आता उर्वरित ६३ जागांसाठी मतदान होणार असून या जागांसाठी पुढील काळात प्रचाराची रंगत आणि राजकीय संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.**

# मनपा निवडणुकीत कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस दल सज्ज

**● हद्दपारी, शस्त्रजप्ती आणि कडेकोट बंदोबस्त; गुन्हेगारांवर पोलिसांची करडी नजर**

प्रतिनिधी । जळगाव

आगामी जळगाव शहर महानगरपालिका निवडणूक २०२६ शांततेत, निर्भय आणि कायदा-सुव्यवस्थेच्या चौकटीत पार पडावी, यासाठी जळगाव जिल्हा पोलीस दल पूर्णपणे सज्ज झाले आहे. निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस प्रशासनाने प्रतिबंधात्मक कारवायांचा वेग वाढवला असून, आतापर्यंत शस्त्र परवानाधारकांकडून २५१ शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.

जळगाव शहरातील १९ प्रभागांमधून ७५ नगरसेवक पदांसाठी ही निवडणूक होत असून, यासाठी १६९ मतदान केंद्रांवर एकूण ५१६ मतदान बूथचे नियोजन करण्यात आले आहे.

मतदान प्रक्रिया भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून सविस्तर सुरक्षा आराखडा तयार करण्यात आला आहे. निवडणूक कालावधीत शहरात गोंधळ निर्माण करण्याची शक्यता असलेल्या तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या ९८ इसमांना जळगाव शहरातून हद्दपार करण्याचे प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत. त्यापैकी ७८ इसमांचे हद्दपारी प्रस्ताव मंजुरीसाठी अपर पोलीस अधीक्षकांकडे सादर करण्यात आले आहेत. याशिवाय महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम १४९ अन्वये १५० इसमांना नोटिसा बजावण्याचे प्रस्तावित असून, त्यातील ६१ जणांना आतापर्यंत नोटिसा देण्यात आल्या आहेत.

निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने शहरात तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. यामध्ये ०९ पोलीस उपअधीक्षक, २१ पोलीस निरीक्षक, ६० सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक, १०७० पुरुष आणि १३७ महिला पोलीस अंमलदारांचा समावेश आहे. तसेच ०८ दंगा नियंत्रण पथके, ०२ शीघ्र प्रतिसाद दल, ०१ एसआरपीएफ कंपनी आणि ११०० होमगार्ड्सची मदत घेण्यात येणार आहे. निवडणूक शांततेत आणि सुरळीत पार पाडण्यासाठी पोलीस दल सतत सतर्क असून, कोणत्याही गैरप्रकाराला थारा दिला जाणार नाही, अशी माहिती जनसंपर्क अधिकारी, पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव यांनी दिली आहे.

# विद्यापीठात ९ जानेवारी रोजी ‘साहित्यातील मानवतावाद’ यावर राष्ट्रीय चर्चासत्र

प्रतिनिधी । जळगाव

**प्रतिनिधी कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातर्फे नववर्षा आगमनाप्रीत्यर्थ आणि ९ जानेवारी २०२६ रोजी होऊ घातलेल्या साहित्यातील मानवतावाद या राष्ट्रीय चर्चासत्राच्या अनुषंगाने मानवतावाद या विषयावरील भित्तीपत्रीकेचे विमोचन वाणिज्य आणि व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे उपस्थित होते.**

मानवतावाद ही मानवाच्या सर्वकष कल्याणाचा विचार करणारी विचारधारा आहे. नववर्षाच्या निमित्ताने माणूस म्हणून सर्व माणसांना भयमुक्त जगता यावे, येणार्या वर्षात माणसाचे जीवन अधिक नीतिमान आणि समृध्द व्हावे या सदिच्छा भित्तीपत्रिकेच्या



माध्यमातून व्यक्त करण्याची संकल्पना प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे यांनी व्यक्त केल्यानंतर संपादक मंडळाने तदनुषंगिक साहित्य संपादित करून भित्तीपतत्रिका तयार केली. या भित्तीपत्रिकेचे विमोचन अधिष्ठाता प्रा. डॉ. अनिल डोंगरे यांनी केले. भित्तीपत्रिका तयार करण्यासाठी प्रा. डॉ. म. सु. पगारे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. दीपक खरात, डॉ. सुदर्शन भवरे, प्रीती सोनी, खेमराज पाटील, प्रीती मनुचारी, नेहा लाम्हणे, चेतना शिंदे, भाग्यश्री लाखे, हर्षदा महाजन, स्वप्नील जाधव, निकिता ठाकूर, नेहा ठाकूर यांनी संपादक मंडळाचे काम पहिले.

## पान १ वरुन

**माघारीसाठी भाजपाच्या......**

सांगितले जात आहे. यादरम्यान पक्षातील नाराजीतून गोरेगाव आणि दिंडोशीमधील शिंदे गटातील विभाग प्रमुखासह २०० कार्यकर्त्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिल्याची माहिती आहे.

गोरेगाव दिंडोशी भागातील प्रभागांमधून शिंदे आणि भाजपाचे उमेदवार निवडणूक लढवत आहे. त्यातच प्रभाग क्रमांक ५४ शिंदे गटाकडे असतानाही भाजपाला सोपविण्यात आल्याने पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर उमटला आहे.

**शासकीय जनआरोग्य योजनांमधून......**

सर्वसामान्य आणि गरजू नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय उपचार मोफत मिळावेत, या उद्देशाने शासन जनआरोग्य योजना प्रभावीपणे राबवत आहे. या योजना शासनाच्या नियमानुसारच राबविल्या गेल्या पाहिजेत. मात्र शिधावाटपपत्रिकेची मूळ प्रत उपलब्ध नसणे किंवा इतर किरकोळ कारणांमुळे रुग्णांना उपचारांपासून वंचित ठेवले जाऊ नये. अशा वेळी डिजिटल रेशनकार्ड व्हेरिफिकेशनचा वापर करून रुग्णांवर तातडीने उपचार करण्यास प्राधान्य देण्यात यावे, असे आबिटकर यांनी सांगितले. रुग्णांना कागदपत्रे, मंजुरी प्रक्रिया किंवा तांत्रिक अडथळ्यांमुळे त्रास होऊ नये, यासाठी रुग्णालयांतील समन्वयकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. समन्वयकांनी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांना आवश्यक मार्गदर्शन करून उपचार प्रक्रिया सुलभ करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

**बी.एस्सी नर्सिंगच्या पाच......**

परिषदेने घेतला. त्यानुसार २६ ते ३१ डिसेंबर या कालावधीत बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाची विशेष फेरी राबविण्यात आली. मात्र या फेरीनंतरही बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रमाच्या तब्बल ५ हजार ५७३ जागा रिक्त राहिल्या आहेत. राज्यात यंदा शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची १७ महाविद्यालये आणि २७७ खासगी महाविद्यालये अशी २९४ महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांमध्ये १६ हजार ५३० जागा आहेत. १७ सरकारी महाविद्यालयांमधील १ हजार १८० जागांपैकी १ हजार १७४ जागांवर प्रवेश झाले असून, फक्त ६ जागा रिक्त आहेत.

तसेच २७७ खासगी महाविद्यालयांमध्ये १५ हजार ३५० जागा होत्या. यापैकी ९ हजार ७८३ जागांवर प्रवेश झाले. त्यामुळे खासगी महाविद्यालयांमधील ५ हजार ५६७ जागा रिक्त राहिल्या आहेत. राज्यभरामध्ये ५ हजार ५७३ रिक्त जागा रिक्त राहिल्या असून, या जागांचे काय असा प्रश्न निर्माण झाला आहे.

**ई-केवायसी न केलेल्या......**

आहेत. या निर्णयामुळे सरकारच्या तिजोरीवरील भार काही प्रमाणात कमी होईल.निवडणूक आणि तांत्रिक कारणांमुळे नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यांचे हप्ते प्रलंबित होते. त्यापैकी नोव्हेंबरचा हप्ता १ जानेवारीपासून बहुतांश महिलांच्या खात्यात जमा झाला आहे.

ज्या महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली आहे, त्यांच्या खात्यात आता १५०० रुपये जमा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.दरम्यान, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जून २०२४ मध्ये या योजनेची घोषणा केली होती. सुरुवातीला तब्बल २ कोटी ६२ लाख अर्ज दाखल झाले होते. मात्र, छाननीमध्ये अनेक त्रुटी समोर आल्या. गेल्या दीड वर्षांपासून राज्यातील सुमारे २ कोटी महिला या लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत आहेत. राज्य सरकारने जाहीर केलेल्या या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांच्या खात्यात दर महीना १५०० रुपये जमा होता.

**भाजप उमेदवारांचा वाद......**

दोनमध्ये शालन शिंदे या भाजपच्या अधिकृत उमेदवार आहेत, तर त्यांच्याविरोधात भाजपच्या बंडखोर रेखा सरवदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. रेखा सरवदे यांनी अर्ज माघारी घ्यावा यासाठी शिंदे आणि सरवदे या दोन गटात मोठा वाद झाला, या वादात भाजप नेते शंकर शिंदे यांचे कार्यालय देखील फोडण्यात आले.

मात्र, त्याचवेळी शिंदे गटाच्या लोकांनी मध्यस्तीसाठी आलेल्या बाळासाहेब सरवदे यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याचा आरोप सरवदे यांच्या नातेवाईकांनी केला आहे. या हल्यात गंभीर जखमी झालेल्या बाळासाहेब सरवदे यांना उपचारासाठी सोलापूरच्या सहकारी रुणालयात दाखल करण्यात आले.

मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. या घटनेनंतर शहरात तणावाचे वातावरण असून पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला आहे. मनसेचा गंभीर आरोप - मनसे लोकसभा क्षेत्र प्रमुख प्रशांत इंगळे यांनी सांगितले की, ‘भाजपकडून प्रभाग २ चे संपूर्ण पॅनल बिनविरोध करण्यासाठी मोठा दबाव होता.

सरवदे कुटुंबावर दबाव आणला जात होता. समाजात वाद नको म्हणून मध्यस्थी करण्यासाठी बाळासाहेब सरवदे गेले होते. शिंदे गटातील लोकांनी त्यांची हत्या केली’. घटना राजकीय वादातून घडल्याचा त्यांचा ठाम दावा आहे.

# अभिवाचन स्पर्धेची १४ जानेवारीला प्राथमिक फेरी

प्रतिनिधी । जळगाव

व.वा. वाचनालय व रंगगंध कलासक्त न्यास चाळीसगांव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अभिवाचन स्पर्धेची प्राथमिक फेरी १४ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार आहे.

जळगाव येथील व.वा. जिल्हा वाचनालय आणि रंगगंध कलासक्त न्यास चाळीसगांव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित साहित्य अभिवाचन स्पर्धेची जळगांव केंद्रातील प्राथमिक फेरी शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता वाचनालयाचे रामनारायण अग्रवाल सभागृहात होणार असून स्पर्धेत १६ वर्षावरील विद्यार्थी व कलावंतांना सहभागी होता येईल. स्पर्धेसाठी दोन ते पाच जणांचा संघ असावा. स्पर्धेत वाचन साहित्याचा विषय कविता आणि कवितेविषयी काहीही किंवा ललित लेखन, नाटक, लघुनाटिका किंवा एकांकिका चालणार नाही. रंगभूषा, वेशभूषा, नेपथ्य, प्रकाश योजनेची अनुमती नाही. पार्श्वसंगीत वापरता येईल.

सादरीकरणासाठी २५ ते ३० मिनिटांचा अवधी देण्यात येईल. नोंदणी शुल्क रु. ५००/- नाव नोंदणीची अंतिम दि. ८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत. यावर्षी पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त चाळीसगांव येथे या स्पर्धेच्या अंतिम फेरीचे विशेष आयोजन होणार आहे तरी जास्तीत जास्त स्पर्धकांनी, महाविद्यालयांनी व विविध कलावंत संस्थांनी स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन वाचनालयाने केले आहे. स्पर्धेसंबंधी अधिक माहितीसाठी श्री. अनिल अत्रे, ग्रंथपाल मो.क्र. ९४०४०५३५७९ व श्रीमती संघमित्रा भालेराव मो.क्र. ९११२३८५३६० यावर संपर्क साधावा.

# डॉ. उल्हास पाटील रुग्णालयाच्या शिबिरात ४२ दात्यांचे रक्तदान





प्रतिनिधी । जळगाव

येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयाच्या रक्तपेढीतर्फे आयोजित रक्तदान शिबीरात ४२ दात्यांनी रक्तदान केले. याप्रसंगी रक्तदात्यांना प्रशस्तीपत्रही देण्यात आले.

नूतन वर्षानिमित्त डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात समाजोपयोगी उपक्रम घेण्यात आले. यात रक्तपेढीतर्फे वर्ष नवे, संकल्प नवे याला अनुसरून रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबीराचे उद्घाटन माजी खा. डॉ. उल्हास पाटील, वैद्यकीय रूग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रेमचंद पंडीत यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रक्तदान शिबीरात उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

**● नूतन वर्षानिमित्त रक्तपेढीतर्फे समाजोपयोगी उपक्रम**

४२ विद्यार्थ्यांनी या शिबीरात रक्तदान केले. याप्रसंगी माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांनी सांगितले की, नव्या वर्षात नवनवीन संकल्प केले जातात. मात्र हे संकल्प तडीसही न्यावे लागतात. डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या रक्तपेढीतर्फे रक्तदान शिबीरांचा संकल्प हा स्तुत्य असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी रक्तपेढीचे समन्वयक लक्ष्मण पाटील यांच्यासह रक्तपेढीच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## भाजपाचे बंडखोर ठाकरे गटात

# महापालिका निवडणुकीत भाजपसमोर नवे आव्हान

प्रतिनिधी । जळगाव

**आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपला अंतर्गत बंडखोरीचा मोठा फटका बसताना दिसत आहे.**

विधानसभा निवडणुकीत भाजपच्या अधिकृत उमेदवाराविरोधात बंडखोरी करत निवडणूक लढविणाऱ्या पक्षातील माजी पदाधिकाऱ्यांना महापालिका निवडणुकीत तिकीट नाकारण्यात आले. परिणामी नाराज झालेल्या या बंडखोरांनी आता शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटात प्रवेश करत अनेक प्रभागांत भाजप उमेदवारांविरुद्ध थेट दंड थोपटले आहेत. विशेषतः पिंप्राळा परिसरात भाजपसाठी ही मोठी राजकीय धोक्याची घंटा मानली जात आहे. येथील माजी पदाधिकारी मयूर कापसे तसेच माजी नगरसेवक धीरज सोनवणे यांनी ठाकरे गटाची मशाल हाती घेतली असून, त्यांना शिवसेना (उबाठा)कडून अधिकृत उमेदवारी देण्यात आली आहे. यामुळे या प्रभागात लढत अधिकच रंगतदार होणार असल्याचे चित्र आहे. या घडामोडींमुळे महापालिका निवडणुकीतील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे स्पष्ट असून, भाजपसाठी ही बंडखोरी डोकेदुखी ठरणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

**● विधानसभा बंडखोरीचा फटका**

**विधानसभा निवडणुकीत भाजपचे अधिकृत उमेदवार सुरेश भोळे यांच्याविरोधात मयूर कापसे आणि माजी उपमहापौर डॉ. अश्विन सोनवणे यांनी बंडखोरी करत निवडणूक रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला होता. या बंडखोरीमुळे पक्षात प्रचंड नाराजी निर्माण झाली होती. त्याचबरोबर डॉ. अश्विन सोनवणे यांच्यासोबत सक्रियपणे काम केल्याचा ठपका ठेवत माजी नगरसेवक धीरज सोनवणे यांनाही पक्षाने काही काळापासून दूरच ठेवले होते.**

**➤ पुनर्प्रवेशाचे प्रयत्न फसले**

विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर या बंडखोरांनी पुन्हा भाजपमध्ये प्रवेशासाठी जोरदार प्रयत्न केले. मात्र, सुरेश भोळे यांच्या तीव्र विरोधामुळे पक्षाने या नेत्यांना पुन्हा स्वीकारण्यास नकार दिला. परिणामी, महापालिका निवडणुकीत या नेत्यांनी ठाकरे गटाची वाट धरत भाजपविरोधात ताकदीनिशी मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८८१३१३२) (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# धुळे मनपात भाजपाचा बिनविरोध निवडीचा चौकार

## ● प्रभाग १७ मधील सुरेखा उगलेंसह अमोल मासुळे विजयी; समर्थकांसह कार्यकर्त्यांचा आमदार कार्यालयात जल्लोष

प्रतिनिधी । धुळे

**येथील महापालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या प्रभाग १ अ मधील उमेदवार उज्वला रणजित भोसले, प्रभाग ६ ब मधील ज्योत्स्ना प्रफुल्ल पाटील व प्रभाग १७ ब मधील उमेदवार सुरेखा भोसले यांच्या पाठोपाठ आज भाजपचेच प्रभाग १७ अ मधील उमेदवार अमोल मासुळे यांच्या विरोधातील सर्व उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने त्यांचीही बिनविरोध निवड निश्चित झाली. यामुळे भाजपने महापालिका निवडणुकीत बिनविरोध उमेदवार निवडीचा चौकार मारला असून विरोधकांच्या गोटात चांगलीच खळबळ उडाली आहे.**





येथील महापालिका निवडणुकीसाठी दाखल उमेदवारी अर्जांच्या छाननीच्या दिवशीच म्हणजे ३१ डिसेंबरला भाजपच्या प्रभाग १ अ मधील उमेदवार उज्वला भोसले व प्रभाग ६ ब मधील उमेदवार ज्योत्स्ना पाटील यांची बिनविरोध निवड होणार असल्याचे स्पष्ट झाले होते. या दोन्ही महिला उमेदवारांच्या विरोधातील अन्य उमेदवारांचे अर्ज अवैध ठरल्याने दोघींची बिनविरोध निवड निश्चित झाली. यानंतर उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या पहिल्या दिवशी म्हणजे १ जानेवारीला प्रभाग १७ ब मधील भाजपच्या उमेदवार सुरेखा उगले यांच्या विरोधातील सर्व उमेदवारांनी बिनशर्त माघार घेतल्याने सौ. उगले यांची बिनविरोध निवड निश्चित झाली. आज अर्ज माघारीच्या दुसऱ्या दिवशी प्रभाग १७ अमधील भाजपचेच उमेदवार अमोल ऊर्फ बंटी मासुळे यांच्या विरोधातील अन्य सर्व उमेदवारांनीही आपले अर्ज मागे घेतल्याने श्री. मासुळे यांचीही बिनविरोध निवड निश्चित झाली. यातून भाजपने निवडणुकीपूर्वीच तब्बल चार जागा बिनविरोध करून दाखवत विरोधकांवर आघाडी घेतली आहे.

### ➢ सौ. उगले, मासुळे यांचा सत्कार

अर्ज माघारीच्या मुदतीत बिनविरोध निवड झालेल्या प्रभाग १७ बच्या उमेदवार सुरेखा उगले यांचा काल दुपारी, तर प्रभाग १७ अचे उमेदवार अमोल मासुळे यांचा आज आमदार अनुप अग्रवाल यांच्या संपर्क कार्यालयात पुष्पगुच्छ देत सत्कार करण्यात आला. यावेळी पालकमंत्री जयकुमार रावल, आमदार अनुप अग्रवाल, आमदार राम भदाणे, माजी मंत्री डॉ. सुभाष भामरे, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, रवींद्र बापूजी शेलार, नगरसेविका सुरेखा उगले, गौरव उगले, अजय अग्रवाल यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार जल्लोष करत विजयाचा आनंदोत्सव साजरा केला. तसेच घोषणाबाजी करत कार्यालय परिसर दणाणून सोडला.

# आचारसंहितेबाबत तक्रारीसाठी संपर्काचे आवाहन

प्रतिनिधी । धुळे

**राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार धुळे महापालिका क्षेत्रात धुळे महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ चा कार्यक्रम जाहीर झाला असून, संपूर्ण महापालिका क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे.**

निवडणूक कालावधीत निवडणूक प्रक्रियेशी संबंधित अथवा आदर्श आचार संहितेबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी किंवा निवेदने असल्यास धुळे महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी आचारसंहिता कक्ष, धुळे महापालिका नवीन इमारत, धुळे येथे सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत तक्रार दाखल करु शकतील. हा नियंत्रण कक्ष १४ जानेवारी, २०२६ रोजी संपुर्ण दिवस व रात्र कालावधीसाठी सुरु राहणार आहे. तसेच लेखी तक्रारी drodhule2011 gmail. com या ई-मेलवर किंवा ०२५६२-२९५०१८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून सादर करता येतील.

**➢ तक्रार अथवा निवेदन सादर करतांना संबंधित पुरावे जोडणे आवश्यक असून प्राप्त तक्रारींचे निरसन आचार संहिता कक्षामार्फत करण्यात येणार आहे. असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा आचार संहिता कक्ष प्रमुख संजय बागडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.**

## थोडक्यात

### नवापूर येथे दोन दुचाकींना आग

**नवापूर ।** शहरातील भिमनगर भागात दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी मध्यरात्री २.३० ते ३ वाजेच्या सुमारास दोन दुचाकी वाहनांना आग लागल्याची घटना घडली. ही आग अज्ञात व्यक्तीने लावली की इतर कोणत्या कारणामुळे लागली, याबाबत अद्याप प्रश्नचिन्ह कायम आहे. या घटनेत रॉयल एनफिल्ड बुलेट (क्रमांक एम.एच. ३९ ए.एन. २२६१) व दुसरी बुलेट (क्रमांक एम.एच. ३९ ए.आर. ७७३६) ही दोन दुचाकी वाहने पूर्णतः जळून खाक झाली आहेत. सदर दुचाकींचे मालक प्रशांत भिमराव पगारे व पूनम दामू बिऱ्हाडे असल्याची माहिती मिळाली आहे. अचानक घडलेल्या या घटनेमुळे भिमनगर परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

### अक्कलकुवा येथे तंबाखूमुक्त कार्यशाळेचे आयोजन

**अक्कलकुवा ।** सलाम मुंबई फाऊंडेशन व जिल्हा परिषद शिक्षण विभाग नंदुरबारच्या वतीने विद्या विकास मंडळ माध्यमिक शाळा अक्कलकुवा येथे एक दिवसीय तंबाखूमुक्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन सीनियर कॉलेजचे प्राचार्य एस.बी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी राकेश देसले, कैलास लोहार, केंद्रप्रमुख मो. आरीफ पिंजारी, भटु बंजारा उपस्थित होते. कार्यशाळेत तंबाखूमुळे होणारे वेगवेगळे आजार त्याचे सामाजिक व आर्थिक परिणाम बालवयापासून कशाप्रकारे परिणाम करतात याबद्दल माहिती देण्यात आली. विविध प्रकारचे फोटो व पी.पी.टी. दाखवून माहिती देण्यात आली.

### युवांना इस्त्रायलमध्ये रोजगाराची संधी

**नंदुरबार ।** शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत पात्र उमेदवारांना इस्त्रायल देशामध्ये रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता। मार्गदर्शन केंद्राचे प्रभारी सहायक आयुक्त मंगेश वाघ यांनी कळविले आहे. या भरती प्रक्रियेद्वारे नूतनीकरण बांधकाम क्षेत्रात एकूण २ हजार ६०० पदांसाठी नोकरीची सभी उपलब्ध असून प्लास्टरिंग काम, सिरॅमिक्त टाइलिंग, ड्रायवॉल काम व मेसन, गवंडी काम या पदांसाठी भरती होणार आहे. अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी निकष शैक्षणिक पात्रता किमान १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. २५ ते ५० वयोगटातील उमेदवार पात्र आहेत, उमेदवाराकडे संबंधित क्षेत्रात कमीत कमी ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

# नवापूर एस.टी.आगारात रस्ता सुरक्षितता अभियानाचा शुभारंभ



प्रतिनिधी । नवापूर

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नवापूर एस.टी. आगार विभागात रस्ता सुरक्षितता अभियान दि.१ ते ३१ जानेवारी या कालावधीत राबविण्यात येत असून या अभियानाचे उद्घाटन पोलीस निरीक्षक अभिषेक पाटील व मोटार वाहन निरीक्षक निलेश जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.**

याप्रसंगी विभागीय भांडार अधिकारी तथा नवापूर आगार पालक अधिकारी चंद्रकांत पोदार, आगार प्रमुख विजय पाटील, सहाय्यक वाहतूक अधीक्षक आर. एस. जगताप, आगार लेखाकार भाई पवार, सहाय्यक नियंत्रक रविंद्र ठाकरे, सेवानिवृत्त वाहक एस.बी.अहिरे, एस.टी. कामगार संघटनेचे सचिव संजय शिंदे, वाहतूक नियंत्रक व्ही. एम. गावीत आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार आगार प्रमुख विजय पाटील हस्ते यांच्या करण्यात आला. यावेळी पोलीस निरीक्षक अभिषेक पाटील म्हणाले की, एस.टी. चालकांनी रस्त्यावर चालणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या सुरक्षिततेची जबाबदारी घ्यावी. चालकांनी वेळोवेळी आरोग्य तपासणी करून घ्यावी. चालक सुरक्षित असेल, तर प्रवासीही सुरक्षित राहतो. मोटार वाहन निरीक्षक निलेश जगताप यांनी रस्ता सुरक्षितता म्हणजे पादचारी, दुचाकी व चारचाकी वाहनचालक सर्वांची सुरक्षितता, दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर अत्यावश्यक असून त्यामुळे अपघातात प्राण वाचू शकतात, असे सांगितले.

आगार प्रमुख विजय पाटील यांनी सांगितले की, सुरक्षितता ही चालकाने रोज पाळली पाहिजे. एस.टी. बसमध्ये प्रवासी विश्वासाने प्रवास करतात. वाहकांनीही बसमध्ये बारकाईने लक्ष ठेवून कोणतीही संशयास्पद वस्तू किंवा परिस्थिती आढळल्यास तत्काळ संबंधित पोलीस ठाणे व एस.टी. आगार प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन केले.

## न्युबनला घरफोडी; हजाराचा ऐवज लंपास

प्रतिनिधी । तळोदा

तालुक्यातील न्युबन येथे अंबालाल ठाकरे यांच्या घरी चोरी झाली आहे.चोरट्याने दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. यावेळी १३ हजार रूपयांची रोकड, ५ हजाराचे चांदीचे दागिने, हातातील वाळे, ८ हजाराच्या चांदीच्या बांगड्या, तीन हजाराचे पायातील चारणे व बेले ४ तोळे दोन हजाराचा मोबाईल असा एकूण ३८ हजार ५०० रूपयांचा ऐवज लांबविला आहे.

# ब्रह्मचैतन्य मंदिरात ३० वर्षांनंतर हरिहाट सोहळा

प्रतिनिधी । धुळे

शहरातील नकाणे रोडवरील गोकर्ण सोसायटीनजीक असलेल्या ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात तब्बल ३० वर्षानंतर हरिहाट सोहळ्याचे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले. यापूर्वी १९९५ मध्ये असा सोहळा झाला होता. तीन दिवस चाललेल्या या सोहळ्याने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

या सोहळ्याची सुरुवात नामस्मरण, जपमाळ, गुरुपूजन आणि गणेशपूजनाने झाली. उत्सवाच्या तिन्ही दिवसांत काकडा आरती, ज्ञानेश्वरी वाचन, पालखी सोहळा, अभिषेक आणि विशेष भूमिपूजन पार पडले. याप्रसंगी प्रतिभा अग्निहोत्री आणि उषा कुलकर्णी यांच्या भारुडाने रंगत आणली, तर पुण्याचे श्रेयस बुवा बडवे यांनी भाविकांशी संवाद साधला. पारमार्थिक शंका समाधान, वेदपठण आणि सद्गुरू लीलामृत वाचनाने साधकांना आध्यात्मिक शिदोरी मिळाली. विशेष सोहळ्याची युवक, युवती आणि महिला साधकांनी संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी पेलली होती. नियोजनापासून ते आर्थिक व्यवस्थापनापर्यंत सर्व बाबी साधकांनी स्वबळावर हाताळल्या. यावेळी पालखी सोहळा आयोजित केला होता.

रेणुका भजनी मंडळाचे भजन आणि पुरोहितांच्या मंत्रोच्चारात झालेल्या होमहवनाच्या पूर्णाहुतीने सोहळ्याची सांगता झाली. याप्रसंगी आयोजित महाप्रसादाचा लाभ शेकडो भाविकांनी घेतला.

# जिल्ह्यातील ११ उपकेंद्रांवर उद्या नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा

प्रतिनिधी । धुळे

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचेमार्फत धुळे जिल्ह्यातील ११ उपकेंद्रावर महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ रविवार, दि.४ जानेवारी, रोजी सकाळी ११ ते १२ या कालावधीत घेण्यात येणार आहे.**




परिक्षा केंद्राच्या २०० मीटर परिसरात कुणीही गर्दी, गोंधळ निर्माण करु नये या उद्देशाने व परिक्षा सुरळीत पार पाडणेच्यादृष्टीने परिक्षा केंद्राचे आवारापासुन २०० मीटर अंतरापर्यंत भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार हे मनाई आदेश उपविभागीय दंडाधिकारी रोहन कुवर यांनी जारी केले आहे.

कमलाबाई शंकरलाल कन्या शाळा, जो. रा. सिटी हायस्कुल, जयहिंद हायस्कुल व ज्युनिअर कॉलेज, भाग-अ, जयहिंद हायस्कुल व ज्युनिअर कॉलेज, भाग-ब, झुलाल भिलाजीराव पाटील ज्यु. कॉलेज, नॅशनल उर्दू हायस्कुल, एम.एस. सरदार उर्दू हायस्कुल व ज्यु. कॉलेज, कनोसा कॉन्व्हेंट हायस्कुल, श्री छत्रपती शिवाजी हायस्कुल, आर. के. चितळे हायस्कुल व जिजामाता कन्या विद्यालय, धुळे या ११ उपकेंद्रांवर परिक्षा होणार आहे. परिक्षा केंद्राचे २०० मीटर परिसरात परिक्षार्थी शिवाय इतर कोणासही प्रवेश असणार नाही. परिक्षार्थींना मोबाईल, पेजर, गणकयंत्राचा वापर परिक्षा केंद्राचे परिसरात करता येणार नाही.

# शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे शिक्षण आवश्यक

प्रतिनिधी । धुळे

वाहतूक नियमांचे पालन करणे प्रत्येक सर्वांच्याच हिताचे आहे.शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे शिक्षण देणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी म्हटले, वाहनधारकाने नियमांचे काटेकोर पालन केल्यास अपघातांचे प्रमाण कमी होण्यास निश्चितच मदत होईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात जिल्हा रस्ता सुरक्षा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताहाचे उद्घाटन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजीज शेख, अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता अनिल पवार, महानगरपालिका उपायुक्त करुणा डहाळे, प्रादेशिक परिवहन अधिकारी अशोक पवार, कार्यकारी अभियंता रवींद्र पाटील, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी चारुदत्त व्यवहारे, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभागीय व्यवस्थापक पुरुषोत्तम व्यवहारे उपस्थित होते.



**शहादा – शहरात गेल्या आठवड्यापासून थंडीचा मोठ्या प्रमाणात जोर वाढत आहे. तसेच हिरवा भाजी-पाल्याच्या किंमतीही वधारल्या आहे. त्याचप्रमाणे शहरात मोठ्या प्रमाणात पपई विक्रीसाठी दाखल झाली आहे.**

# लोकशाही बळकटीसाठी विद्यार्थ्यांनी घरोघरी जावून केली मतदान जनजागृती

प्रतिनिधी । धुळे

**महापालिके च्या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरु असून विद्यार्थ्यांकडून मतदान करावे यासाठी जनजागृती करण्यात येत आहे.**




महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत लोकशाही बळकट करण्यासाठी समाजातील सर्व स्तरातील लोकांनी मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. महिला, युवक, दिव्यांग मतदार सर्वांनी मतदानाचा अधिकार बजावला पाहिजे. यासाठी धुळे महापालिका कार्यक्षेत्रातील दिव्यांग मतदारांनी १०० टक्के मतदान केले पाहिजे या उद्देशाने आयुक्त नितीन कापडणीस, अति. आयुक्त करुणा डहाळे, समाजविकास अधिकारी मीना सातभाई यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील महाविद्यालय, मोराणे, एसएसव्हीपीएस सायन्स कॉलेज, विद्यावर्धिनी कॉलेज, समाजकार्य महिला महाविद्यालय अशा महाविद्यालयातील एनएसएसच्या विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून घेण्यात आले आहे. ते पत्र दिव्यांग मतदारांपर्यंत गृहभेट घेवून स्वयंसेवकांमार्फत पोहचविण्यात येवून दिव्यांग मतदारांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात येत आहे. अशा महापालिकेमार्फत पध्दतीने दिव्यांग मतदारांना मतदान जनजागृती करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले जात आहे. मिना सातभाई समाज विकास अधिकारी यांनी राष्ट्रीयसेवा योजनेचे महत्व पटवून दिले. यासाठी सर्व महाविद्यालयीन प्राचार्य, प्राध्यापक यांचे सहकार्य लाभले तसेच समुह संघटक सुनिल सरदार, धम्मदिप सावंत, छाया पाटील, सुनिता निकम यांचे सहकार्य मिळाले.

**स्वयंसेवकांना महाविद्यालयात जावून प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्या स्वयंसेवकांमार्फत आयुक्त नितीन कापडणीस यांनी दिव्यांग मतदारांना मतदानासाठी प्रेरणा, प्रोत्साहन मिळावे यासाठी सुंदर पत्र लिहिले आहे.**



दिव्यांग मतदार जनजागृती मोहिमेसाठी धुळे शहरातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व प्राध्यापक, कर्मचारी यांचे अनमोल असे सहकार्य मिळाले.

# भुसावळात ७५ मद्यपींची पोलिसांनी उतरवली 'झिंग'

## नाकाबंदीत ३३८ वाहनधारकांवर कारवाईचा बडगा

प्रतिनिधी । भुसावळ

**सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी मोठ्या उत्साहाचे वातावरण शहरात निर्माण झाले होते. शहरातील विविध हॉटेल्स, रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेते, फास्टफूड गाड्या नववर्षाच्या स्वागतासाठी सज्ज होत्या तेथे खवय्यांची मोठीच गर्दी झाली. एकीकडे तरुणाईत जल्लोषाचे वातावरण दिसून येत असताना दुसरीकडे कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाच्या विशेष पथकांकडून नाकाबंदी करीत कारवाई करण्यात आली. ७५ मद्यपी व ३३८ वाहनांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला.**



शहरातील सर्वच प्रमुख रस्त्यांवर पोलिसांचा कडक बंदोबस्त लावण्यात आला होता. सुमारे १२८ पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी शहरातील विविध ठिकाणी तैनात होते. मंगळवार, दि. ३० पासूनच शहरात नाकाबंदी सुरू करण्यात आली. मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांवर विशेष लक्ष ठेवण्यात आले. रात्री प्रत्येक वाहनांची कसून तपासणी करण्यात आली. दुचाकी तसेच चारचाकी वाहनांची गांधी पुतळ्यासह विविध पॉइंटवर तपासणी करण्यात आली.

भुसावळ शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक उद्धव डमाळे, बाजारपेठ पोलीस ठाण्याचे निरीक्षक राहुल वाघ व शहर वाहतूक शाखेचे सहाय्यक निरीक्षक उमेश महाले यांनी त्यांच्या-त्यांच्या कार्यक्षेत्रात धडक कारवाई राबवली. नाकाबंदीत वाहनांची कसून तपासणी करण्यात आली. या कारवाईदरम्यान मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविणाऱ्या ७५ वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली तर मोटार वाहन कायद्याच्या विविध तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या ३३८ वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. पोलिसांच्या सतर्कतेमुळे नववर्षाचा जल्लोष शांततेत आणि सुरक्षित वातावरणात पार पडला. गांधी पुतळा, हंबर्डीकर चौक (पाणी गेट), बाजारपेठ पोलीस ठाण्यासमोर, बसस्थानक परिसर, जामनेर रोड, खडका रोड, जळगाव रोडवरील वाय पॉइंट आदी ठिकाणी नाकाबंदी उभारण्यात आली.

### ड्रंक अँड ड्राईव्हमध्ये ३५ वाहनांचा समावेश

**नाकाबंदीत पोलिसांच्या रडारवर मद्यधुंद वाहन चालकांवर पोलिसांचा विशेष भर होता. संशयित वाहन चालकांची श्वास चाचणी करून तपासणी करण्यात आली. तसेच तीन सीट, धोकादायक वाहन चालविणे, कागदपत्रांचा अभाव आदी बाबींवरही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी केलेल्या ड्रंक अँड ड्राईव्हच्या ७५ केसेसमध्ये ३५ वाहने ही चारचाकी होती. कार चालकांविरूध्द कारवाई करण्यात आली तर उर्वरित मोयर सायकलस्वार यांच्यावर कारवाईचा बडगा उगारला आहे.**

ये-जा करणाऱ्या वाहनांची कागदपत्रे तपासली जात होती. नाकाबंदी अधिक प्रभावी राहावी, यासाठी दर दोन तासांनी नाकाबंदीचे ठिकाण बदलण्यात येत होते. तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दित कुऱ्हा पानाचे येथेही नाकाबंदी करण्यात आली. शहरातील विविध भागात दररोज अजूनही चार दिवस नाकाबंदी ठेवली जाणार आहे, यात ड्रंक अँण्ड ड्राईव्हची मोहिम राबविली जाणार आहे. मध्य रात्रीपर्यंत केलेल्या नाकाबंदीत दोन हजारांचा दंड वसूल केला असून २४ हजार रूपयांचा दंड ऑनलाईन करण्यात आला आहे. वाहनधारकांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस उपअधीक्षक केदार बारबोले यांनी केले.

---

## थोडक्यात

### अंतुर्ली येथे नर्सरी प्लांटचे उद्घाटन

**मुक्ताईनगर ।** तालुक्यातील अंतुर्ली येथे दि. १ जानेवारी २०२६ ला नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी जे. एन. नर्सरी प्लॅन्टचे उद्घाटन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर तराळ यांच्या हस्ते करण्यात आले. या नर्सरी मध्ये केळीचे रोपे तसेच पपईचे रोपे तयार करून ते शेतकऱ्यांना वाजवी दरामध्ये देण्यात येतिल. या प्रसंगी सुधीर तराळ, विनोद तराळ, सुनिल पाटील, दिनू पाटील, अशोक सपकाळ, ताहेर खान, सुरज सोनवणे, शरद तराळ, सुनिल कोकाटे, निवृत्ती पाटील, नामदार खान आदी उपस्थित होते.

### धरणगाव येथील हिरा स्कूलमध्ये बक्षीस वितरण

**धरणगाव ।** शहरातील हिरा इंटरनॅशनल स्कूलमध्ये झालेल्या विविध स्पर्धेचे वार्षिक बक्षीस वितरण उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे अध्यक्ष दीपक नगरिया आणि मुख्याध्यापक जयेश मेहता यांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीप प्रज्वलन करून झाली. कार्यक्रमात नृत्य शिक्षक व संगीत शिक्षक यांनी वर्षभरात जे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले त्यांचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी उत्तम प्रकारे सादर केले. सूत्रसंचालन शिक्षिका राधिका काबरा आणि प्रणिता येवले यांनी केले.

### रां.का. विद्यालयात सामाजिक वनीकरण विभागातर्फे जनजागृती

**बोदवड ।** सामाजिक वनीकरण विभाग नाशिक यांचेतर्फे रांका हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांना वनीकरणाचा चित्रपट दाखवून जनजागृती करण्यात आली. कॉंक्रीटची जंगले वाढून हिरवी जंगले कमी होत आहे. जास्तीत जास्त झाडांची लागवड करून परिसर हा हिरवेगार व समृद्ध करायचा. वाढत्या लोकसंख्येला ऑक्सिजन हा पुरला पाहिजे तसेच हिरव्या झाडांमुळे ग्लोबल वार्मिंगची समस्या कमी झाली पाहिजे, पर्वत नद्या हे टिकले पाहिजे. यासाठी विद्यार्थ्यांना वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले.

---

## विश्वशांतीसाठी सुराणा स्वाध्याय भवनात महामांगलिक जप-तप

प्रतिनिधी । भुसावळ

**भुसावळ शहरातील मातृभूमी चौकातील सुराणा स्वाध्याय भवनात विश्वशांतीसाठी महामांगलिक व जप,तप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**



प.पू.जीनशासन प्रभावक उपाध्याय प्रवर गुरुदेव डॉ.गौतम मुनीजी म.सा., सेवा भावी वैभव मुनीजी आदी ठाणे दोन यांच्या सानिध्यात नूतन वर्षानिमित्त १ जानेवारीला सकाळी ९ ते ११ या वेळात विश्वशांतीसाठी महामांगलिक कार्यक्रम व जप, तप व आराधना करुण महामांगलिक कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमासाठी मालेगाव, मुक्ताईनगर, बोदवड, वरणगाव, भुसावळ, जळगाव येथील सुमारे ७०० भाविकांची उपस्थिती होती. याप्रसंगी सर्व भाविकांना प्रसादी देण्यात आली. हा दिवस एकासना दिवस म्हणून साजरा करण्यात आला. संघपती जयंतीलाल सुराणा, जे.बी.कोटेचा, सुगनचंद सुराणा, कांतीलाल चोरडिया, गौतम चोरडिया आदी उपस्थित होते.

## सततच्या खंडित वीजपुरवठ्याने ग्रामस्थ त्रस्त

प्रतिनिधी । भुसावळ

**सुनसगाव येथे गेल्या काही दिवसांपासून सतत वीज पुरवठा खंडित होत असल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे.**

येथील प्रभाग क्रमांक दोन मध्ये दररोज सकाळी कोणत्या ना कोणत्या भागात विजपुरवठा खंडीत होतो. या भागाचे रोहित्र माध्यमिक शाळेच्या रस्त्यावर राजेंद्र बाविस्कर यांच्या वाड्याजवळ आहे.

सकाळी एकही वीज कर्मचारी उपस्थित राहत नसल्याने गावातील एखादी व्यक्ती फेस टाकून विजपुरवठा सुरू करत असल्याचे समजते. येथील विजवितरण कंपनीच्या कार्यालयात कायमस्वरुपी अभियंता नाही, त्यामुळे तक्रार कोणाकडे करावी हा प्रश्न निर्माण होतो.

यामुळे संबंधीत अधिकारी यांनी याकडे लक्ष देऊन वार्ड क्रमांक दोनचा सतत खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यावर कायमस्वरुपी मार्ग काढावा. अन्यथा एका कर्मचाऱ्याची रात्रपाळीसाठी नेमणूक करावी, अशी मागणी होत असून वार्ड क्रमांक दोन च्या ग्रा.पं. सदस्यांनी याकडे लक्ष देण्याची मागणी केली जाते आहे.

---

## प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम...!

### • हनुमंतखेडेसीम येथील घरकुलांच्या जागेसाठी एकलव्य संघटनेचा एल्गार

प्रतिनिधी । एरंडोल

घरकुल मंजूर झाले, खात्यात हप्तेही जमा झाले पण हक्काची जमीनच नसल्याने हनुमंतखेडेसिम येथील आदिवासी बांधवांचे घराचे स्वप्न अधांतरी टांगले आहे. प्रशासनाच्या या दिरंगाईविरोधात आता एकलव्य संघटना आक्रमक झाली असून एकलव्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पवनराजे सोनवणे यांच्या आदेशानुसार ३० डिसेंबर रोजी प्रशासनाला पुन्हा एकदा निवेदन देण्यात आले.

या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की प्रशासनाने येत्या १५ दिवसांत घरकुलांसाठी नियोजित जागा उपलब्ध न केल्यास एकलव्य संघटनेच्या वतीने तहसील कार्यालयासमोर तीव साखळी आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

हनुमंतखेडेसिम येथील अनेक आदिवासी बांधवांना शासनाच्या योजनेतून घरकुल मंजूर झाले आहे. लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर घराचा पहिला हप्ता देखील जमा झाला आहे. मात्र, घर बांधण्यासाठी हक्काची जागा उपलब्ध नसल्याने हे बांधव अडचणीत सापडले आहेत. हप्त्याचे पैसे खात्यात असूनही हक्काचे छत उभारता येत नसल्याने लाभाथ्यर्थ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे हनुमंतखेडेसिम ग्रामपंचायतीने ठराव करून गावठाण जागेतून लाभाथ्यर्थ्यांना प्रत्येकी ३०० चौरस फूट जागा देण्याचे निश्चित केले आहे. यासाठी जागेचे लेव्हलिंग (सपाटीकरण) देखील पूर्ण झाले आहे. मात्र ही जागा अधिकृतपणे लाभार्थ्यांच्या ताब्यात देण्यासाठी महसूल विभागाची परवानगी आवश्यक आहे. ३० सप्टेंबर २०२५ रोजी यासंदर्भातील रीतसर प्रस्ताव तहसीलदार कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता. परंतु ३ महिने उलटूनही त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

निवेदन देताना एकलव्य संघटनेचे जिल्हाध्यक्ष (अपंग सेल) ऋषी सोनवणे, जळगाव जिल्हा सल्लागार भोलानाथ महाले, एरंडोल तालुकाध्यक्ष वाल्मीक सोनवणे, युवा तालुकाध्यक्ष जय मोरे, सोशल मीडिया प्रमुख गणेश मोरे, दिलीप सोनवणे, परमेश्वर गायकवाड, दगडू ठाकरे, संभाजी गायकवाड, अक्षय कोळी, दिलीप कोळी यांच्यासह हनुमंतखेडेसिम येथील आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## २५ लाखांची खंडणी मागणाऱ्या फेसबुक ब्लॅकमेलरला बेड्या

प्रतिनिधी । अमळनेर

**एका नामांकित सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या सचिवाला २५ लाख रुपयांची खंडणी मागून, पैसे न दिल्यास संस्थेची फेसबुकवर बदनामी करणाऱ्या एका संशयिताला अमळनेर पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे.**

फिर्यादी अशोक हरी खलाणे (वय ६६, रा. चाळीसगाव) हे महात्मा फुले सामाजिक व शैक्षणिक विकास मंडळाचे सचिव आहेत. संशयित आरोपी अनंत रमेश निकम (रा. अमळनेर) याने संस्थेच्या विरोधात एक व्हिडिओ तयार केला होता. हा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित न करण्यासाठी आणि हे प्रकरण थांबवण्यासाठी आरोपीने २५ लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केली होती. जेव्हा फिर्यादींनी खंडणीची रक्कम देण्यास नकार दिला, तेव्हा अनंत निकम याने १५ नोव्हेंबर ते ८ डिसेंबर २०२५ दरम्यान आपल्या फेसबुक प्रोफाइलवरून संस्थेबद्दल खोटी आणि बनावट माहिती असलेले व्हिडिओ प्रसारित करण्यास सुरुवात केली.

**➤ संस्थेला आणि संबंधित व्यक्तींना खोट्या गुन्ह्यात अडकवून आयुष्यभर तुरुंगात टाकण्याची धमकीही त्याने दिली होती. नंतर मध्यस्थीमार्फत बोलणी झाली असता, त्याने ही रक्कम कमी करून ४ ते ५ लाख रुपयांची मागणी केली. पैसे दिले तरच व्हिडिओ थांबवेन, असा दम त्याने भरला होता. या सततच्या त्रासाला कंटाळून अशोक खलाणे यांनी अमळनेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी ३१ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २:४८ वाजता आरोपी अनंत निकम विरुद्ध गुन्हा दाखल केला.**



---

## भूमिका घेऊन साहित्यिकांनी लेखन करावे : डॉ.फुला बागुल

प्रतिनिधी । जामनेर

**समाजपरिवर्तनासाठी साहित्यिकांनी स्पष्ट भूमिका घेऊन लेखन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रख्यात समीक्षक व साहित्यिक डॉ. फुला बागुल यांनी केले.**



जामनेर तालुका साहित्य संस्कृतीच्या वतीने आयोजित दोन दिवसीय जिल्हास्तरीय ग्रामीण युवा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. ज्ञानगंगा विद्यालयाच्या प्रांगणात संमेलनाचे उद्घाटन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या मराठी विभागप्रमुख डॉ. म. सु. पगारे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते म्हणाले की, मानवतावाद जोपासणारे लेखन म्हणजेच खरे साहित्य होय. साहित्य हा समाजाचा आरसा असून, त्यातून सकस समाजनिर्मिती घडविण्याचे सामर्थ्य साहित्यिकांनी निर्माण करावे. यावेळी प्रा. बी. एन. चौधरी व डॉ. आशुतोष पाटील यांनी मार्गदर्शन केले. संमेलनास डॉ.श्रीधर नांदेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून निघालेल्या साहित्य दिंडीने संमेलनाची सुरुवात झाली. मराठी गौरव गीताने श्रोते मंत्रमुग्ध झाले. मंडळाचे अध्यक्ष डी. डी. पाटील यांनी प्रास्ताविक केले.

या प्रसंगी पहर येथील उदयोन्मुख कवयित्री कु. रूपाली कैलास माळी यांच्या 'काव्यांकुर' या काव्यसंग्रहासह 'काव्यदीप' व 'आम्ही सिद्ध लेखिका' या तीन पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. उद्धाटकीय सत्रानंतर प्रा. संध्या महाजन यांनी ओवी गाई बहिणाई'चे प्रभावी सादरीकरण केले. यानंतर प्रा.प्रकाश सपकाळे यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन रंगले. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन डॉ. अशोक पारधे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन नागनंदा मघाडे यांनी केले. मंगळवारी दुपारी संमेलनाची सांगता होणार आहे. ज्ञानगंगा विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र चौधरी मंडळाचे उपाध्यक्ष डॉ.एस.आर. महाजन, गोरख सूर्यवंशी सुकदेव महाजन यांच्यासह पदाधिकारी सहाकार्य करीत आहेत.

## कापूस व्यापाऱ्याला ७ लाखांचा गंडा

### पाचोरा तालुक्यात सावळपिंप्री येथील घटना

प्रतिनिधी । पाचोरा

**तालुक्यातील सावळपिंप्री येथील एका कापूस खरेदी-विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याची गुजरातच्या पाच जणांनी संगनमत करून ७ लाख ५ हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पिंपळगाव हरेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




**• व्यापाऱ्यांनी कापूस विक्री करताना अनोळखी दलाल आणि परराज्यातील मालकांची खात्री करावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.**

फिर्यादी सुभाष पांडुरंग पाटील (वय ५५, रा. सांवळ प्रिप्री, ता. पाचोरा) यांचा शेतीसह कापूस खरेदी-विक्रीचा व्यवसाय आहे. ऑगस्ट २०२५ मध्ये, त्यांनी दलाल शाहिद बशीर मुसलमान (रा. घटनांद्रा, ता. सिल्लोड) आणि जितुभाई जेठालाल यांच्या मध्यस्थीने गुजरात येथील आदेश कॉटन जिनिंग (जलालपुरा रोड, ता. गठाला, जि. बोटाद, सौराष्ट्र) या फॅक्टरीला कापूस विक्रीचा व्यवहार केला होता. सुभाष पाटील यांनी २६ आणि २७ ऑगस्ट २०२५ दरम्यान एकूण तीन ट्रकमध्ये २९१ क्विंटल ७७ किलो कापूस पाठवला होता. या कापसाची एकूण किंमत २१,१२,५९० रुपये इतकी होती. त्यापैकी आरोपींनी १४,०७,५९० रुपयांचे पेमेंट दिले, मात्र उर्वरित ७,०५,००० रुपये देण्यास टाळाटाळ केली. वारंवार मागणी करूनही पैसे न मिळाल्याने आणि दलाल व जिनिंग मालकांनी संगनमत करून फसवणूक केल्याचे लक्षात आल्यानंतर पाटील यांनी पोलिसांत धाव घेतली. पाटील यांच्या फिर्यादीवरून ३१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ९:०८ वाजता पिंपळगाव हरेश्वर पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यानुसार संशयित आरोपी रमेशभाई (जिनिंग मालक), धवलभाई (जिनिंग मालक), कुलराजभाई, जितुभाई जेठालाल (मध्यस्थ), शाहिद बशीर मुसलमान (दलाल, रा. सिल्लोड) यांचा शोध सुरु आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्याणी वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रेड पोलीस उपनिरीक्षक प्रकाश पाटील या प्रकरणाचा तपास करत आहेत.

---

## जळगाव जिल्ह्यात भ्रष्टाचारात महसूल विभाग अव्वल

### गत वर्षात ७७ लाचखोरांवर केली होती लाचलुचपत विभागाने कारवाई

प्रतिनिधी । भुसावळ

**लाचखोरांविरोधात जळगाव एसीबीने धडक कारवाई सत्र अवलंबल्याने लाचखोरांच्या गोटात खळबळ उडाली असली तरी लाच घेणाऱ्यांचे प्रमाण वाढतच चालले आहे. गत २०२५ वर्षात जळगाव एसीबीने विविध विभागात तब्बल ४५ कारवाया केल्यानंतर ७७ लाचखोर जाळ्यात अडकले आहेत. विशेषत: लाचखोरीत महसूल विभाग अव्वल आल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते.**

जळगाव एसीबीने दिलेल्या आकडेवारीनुसार, यंदाही महसूल विभाग लाचखोरीत आघाडीवर आहे, महसूल विभागात सात कारवायांमध्ये १३ जणांना जाळ्यात ओढण्यात आले. त्यापाठोपाठ पोलीस विभाग, जिल्हा परिषद आणि महावितरण या विभागात प्रत्येकी पाच कारवाया करण्यात आल्या.

अशी झाली गत वर्षात कारवाई




महसूल विभाग : ७ कारवाया (१३ आरोपी), पोलीस विभाग : ५ कारवाया (९ आरोपी), जिल्हा परिषद : ५ कारवाया (६ आरोपी), महावितरण : ५ कारवाया (५ आरोपी), शिक्षण विभाग : ४ कारवाया (७ आरोपी), वनविभाग : ३ कारवाया (९ आरोपी), महानगरपालिका/नगरपालिका : एकूण ३ कारवाया (६ आरोपी)

### • २०२५ मध्ये आठ कारवाया अधिक

**एसीबीच्या माहितीनुसार २०२४ मध्ये ३७ गुन्ह्यांमध्ये ६१ आरोपींवर कारवाई करण्यात आली तर २०२५ मध्ये ४५ गुन्ह्यांमध्ये ७८ आरोपींवर कारवाई करण्यात आली व त्यातील ७७ आरोपींना अटक करण्यात आली तर एकाला अटकपूर्व जामीन मिळाला.**

**वरिष्ठ अधिकारीही जाळ्यात**

वर्ग १ चे अधिकारी : ०३, वर्ग २ चे अधिकारी : ०६, वर्ग ३ चे कर्मचारी : ३५, वर्ग ४ चे कर्मचारी : ०४, इतर लोकसेवक व खाजगी व्यक्ती: ३० जण यांचा समावेश आहे.

भ्रष्ट लोकसेवकांविरोधात एसीबीचे पोलिस अधीक्षक भारत तांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली जळगाव एसीबीचे डॅशिंग पोलीस उपअधीक्षक योगेश ठाकूर यांच्या नेतृत्वात सहकाऱ्यांनी कारवाई केली.

लाचखोरांविरोधात कारवाईसाठी १०६४ अथवा पोलिस उपअधीक्षक योगेश ठाकूर यांच्या मोबाईल ९७०२४३३१३१ वर संपर्क साधण्याचे कळवण्यात आले आहे.